# विज्ञानदिनानिमित्त उद्या विविध कार्यक्रमांचे आयोजन

## व्याख्याने, चर्चासत्रांबरोबरच आयुका, जीएमआरटी, एनसीएल पाहण्याची संधी

Sunday 27th Feb 11

**सकाळ वृत्तसेवा**

पुणे, ता. २६ : मुलांमधील विज्ञानाबाबत असणाऱ्या जिज्ञासेला प्रोत्साहन देण्यासाठी व भविष्यातील शास्त्रज्ञ घडविण्यासाठी विज्ञानदिनाच्या निमित्ताने अनेक नावीन्यपूर्ण उपक्रमांचे व कार्यक्रमांचे शहरात आयोजन करण्यात आले आहे. विविध विषयांवरील व्याख्याने, चर्चासत्रे याबरोबरच सर्वांसाठी खुल्या असणाऱ्या आयुका, जीएमआरटी, एनसीएलसारख्या संशोधन क्षेत्रातील अग्रगण्य संस्था हे विद्यार्थ्यांबरोबरच विज्ञानप्रेमींसाठी आकर्षणाचा विषय राहणार आहे.

आत्तापर्यंत अनेक वेळा वाचलेल्या व ऐकलेल्या शास्त्रज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधीही अनेकांना मिळू शकेल. भारतातील नोबेल पारितोषिक विजेते ज्येष्ठ शास्त्रज्ञ सी. व्ही. रमण यांच्या 'रमण इफेक्ट' या शोधाप्रित्यर्थ हा दिन साजरा केला जातो.

**खोडदला विज्ञान प्रदर्शन**

जायंट मीटरव्हेव रेडिओ टेलिस्कोपतर्फे (जीएमआरटी) दोनदिवसीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार व सोमवारी नारायणगावाजवळील खोडदला होणाऱ्या या प्रदर्शनात विविध विषयांवर व्याख्याने, विज्ञान प्रकल्पांचे व खेळांचे सादरीकरण होणार आहे.

टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या नॅशनल सेंटर फॉर रेडिओ ॲस्ट्रोफिजिक्स या संस्थेने उभारलेली जीएमआरटी ही जगातील सर्वांत मोठी रेडिओ दुर्बीण आहे. ही दृश्यस्वरूपाच्या दुर्बिणीपेक्षा वेगळी असते व यातून प्रत्यक्षपणे कोणताही घटक पाहता येत नाही. या प्रकारच्या दुर्बिणीमुळे अवकाशातील अनेक घटकांकडून सोडल्या जाणाऱ्या रेडिओ लहरींचा अभ्यास करता येतो. या दुर्बिणीच्या विविध प्रणालींविषयी माहिती प्रदर्शनात मिळू शकेल; तसेच शास्त्रज्ञांशी थेट संपर्क साधून त्याबाबत प्रश्न विचारता येतील.

याशिवाय प्रदर्शनात टाटा मूलभूत संस्थेतर्फे जीवशास्त्रातील व कॉस्मिक किरणांवर आधारित विविध प्रयोग दाखवण्यात येणार आहेत. हैदराबाद येथील बलून फॅसिलिटीतर्फे बलूनचे उड्डाण व त्याचे प्रयोग दाखवण्यात येणार आहेत. अनेक नामवंत व्यक्तींची विज्ञानविषयक व्याख्याने होणार आहेत. त्यामध्ये ज्येष्ठ शास्त्रज्ञ जयंत नारळीकर, डॉ. शशिकांत धरणे, डॉ. जयंत फाळके, डॉ. महेंद्र सोनावणे यांचा समावेश आहे. देशातील अनेक नामवंत विज्ञान संशोधन संस्था प्रदर्शनामध्ये सहभागी होणार आहेत. या प्रदर्शनाचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रघुनाथ शेवगावकर यांच्या हस्ते होणार आहे.

शिवाजीनगर येथून नारायणगाव व नारायणगावाहून पुढे जीएमआरटी खोडद येथे येण्या-जाण्यासाठी जादा गाड्या सोडण्याची विनंती जीएमआरटीतर्फे करण्यात आली आहे.

**विज्ञान एक्स्प्रेस**

नारायणगाव येथील खोडद येथे भरणाऱ्या विज्ञान प्रदर्शनासाठी विश्व सायंटिफिक संस्थेतर्फे विशेष बसगाड्यांची सोय करण्यात आली आहे. त्यामार्फत इच्छुकांना एका दिवसामध्ये खोडद येथील विज्ञान प्रदर्शन व विद्यापीठातील 'आयुका'ला भेट देण्याची संधी मिळेल. याबाबत अधिक माहिती देताना संस्थेच्या गायत्री उरणकर म्हणाल्या, "खोडद येथे बस बदलून जावे लागते. संध्याकाळी येतानाही एसटीची वारंवारिता कमी असल्यामुळे शालेय विद्यार्थ्यांची गैरसोय होते. त्यामुळे इच्छा असूनसुद्धा अनेक जण जाऊ शकत नाहीत. यासाठी अल्पदरामध्ये बसची सोय करण्यात आली आहे. बससोबत आमचे मार्गदर्शकही उपस्थित असतील. प्रदर्शनातील विविध प्रकल्पाबद्दल ते माहिती देतील." याबाबत अधिक माहितीसाठी ९०११२२०५४२ या क्रमांकावर संपर्क साधावा.



खोडद : सोमवार पासून (ता. २८) भरणाऱ्या प्रदर्शनात जीएमआरटीतर्फे दुर्बिणीच्या विविध प्रणालींविषयी माहिती देण्यात येणार आहे.


**'एनसीएल'तर्फे व्याख्याने**

राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेच्या (एनसीएल) एक्सायटिंग सायन्स ग्रुपतर्फे नॅशनल आउटरीच लेक्चर उपक्रमाअंतर्गत मुंबई येथील टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्चचे शास्त्रज्ञ डॉ. शंकर घोष यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी (२७ फेब्रुवारी) पाषाण येथील 'एनसीएल'च्या इनोव्हेशन पार्क येथे सकाळी १० वाजता हे व्याख्यान होणार आहे. 'फ्रिक्शन' या विषयावर घोष बोलणार आहेत. हे व्याख्यान सर्वांसाठी खुले असून, इच्छुक विद्यार्थ्यांनी www.exicitingscience.org या संकेतस्थळावरून नावनोंदणी करावी.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेटिओरॉलॉजीचे संचालक प्रा. बी. एन. गोस्वामी यांच्या व्याख्यानाचे एनसीएलच्या सभागृहात सोमवारी (२८ फेब्रुवारी) सकाळी ११ वाजता आयोजन करण्यात आले आहे. विषय आहे 'नोन अँड अनोन इंडियन समर मॉन्सून इन चेंजिंग क्लायमेट.'

**'ओळख आकाशाची' व्याख्यान**

एडनेक्सातर्फे 'ओळख अवकाशाची' या विषयावर ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. प्रकाश तुपे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. हे व्याख्यान मयूर कॉलनी येथील बाल शिक्षण मंदिरात सोमवारी सायंकाळी साडेपाच ते साडेसात या वेळात आयोजित करण्यात आले आहे. राष्ट्रपती पुरस्कार विजेते विज्ञान शिक्षक डॉ. अ. ल. देशमुख या वेळी 'शास्त्र आणि अवकाश' या विषयावर बोलणार आहेत. कार्यक्रमात स्लाइड शोमार्फत विविध छायाचित्रे दाखवून चर्चा केली जाईल; तसेच विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले जाईल.



बालशिक्षण मंदिर येथे सोमवारी 'ओळख आकाशाची'मध्ये स्लाईड शो मार्फत अवकाशाची ओळख करून देण्यात येणार आहे.

**'सायफेस्ट'चे आयोजन**

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्चतर्फे (आयआयएसईआर) 'सायफेस्ट २०११' चे आयोजन करण्यात आले आहे. २८ फेब्रुवारीपर्यंत होणाऱ्या या महोत्सवात विविध ज्येष्ठ शास्त्रज्ञांची व्याख्याने, पुस्तक प्रदर्शन, चर्चासत्रे, प्रयोग सादरीकरण होणार आहे. देशातील अनेक नामवंत संशोधन संस्थांचे प्रतिनिधी या महोत्सवात उपस्थित राहून आपले विचार मांडणार आहेत. तीनही दिवस वेगवेगळे कार्यक्रम होणार असून, अधिक माहितीसाठी www.iiserscifest.in या संकेतस्थळावर संपर्क साधावा.

**'सीडॅक' कार्यशाळा**

नेक्स्ट जनरेशन महासंगणक 'परम युवा' यावर आधारित दोनदिवसीय कार्यशाळेचे आयोजन 'सीडॅक'तर्फे सेनापती बापट रस्त्यावरील आयसीसी टॉवर येथे करण्यात आले आहे. या कार्यशाळेत परमयुवा महासंगणकाचा वापर वाढवणे, एचपीसीची आव्हाने व पेटास्केलची उपयोगिता यावर चर्चा करण्यात येणार आहे.

"सीडॅकद्वारा टेरास्केलचे लक्ष्य पूर्ण झाल्यानंतर आता उच्च दर्जाची पेटास्केल प्रणाली विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात जगातील अधिक वेगवान महासंगणक बनविण्यावर 'सीडॅक' भर देणार आहे," असेही भटकर यांनी सांगितले.